वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संरक्षण या योजनेत्तर योजनेखालील १४२ अस्थायी पदे सन २०१९-२० मध्ये पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : - डब्ल्यूएलपी-०३.१८/प्र.क्र.१०४/फ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १५ मार्च, २०१९

<u>वाचावे :-</u>

१. शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्रमांक :- डब्ल्यूएलपी ०३.१८/प्र.क्र.११५/फ-१ दिनांक- २७.०३.२०१८.
२. शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्रमांक :- डब्ल्यूएलपी ०३.१८/प्र.क्र.११५/फ-१ दिनांक- ०३.१०.२०१८.
३. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक :- पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क दिनांक :- २१.०२.२०१९.
४. मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र कक्ष-३/ योजनेतर/ प्र.क्र. ३/१८-१९/२०९१, दिनांक :- २१.०२.२०१८.

<u>प्रस्तावना:-</u>

वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संरक्षण (योजनेत्तर) या योजनेत्तर योजनेखालील १४२ अस्थायी पदांना सन २०१८-१९ मध्ये संदर्भ क्रमांक १ व २ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०३.२०१८ ते दिनांक २८.०२.२०१९ पर्यत चालू ठेवण्यासाठी शासनाची मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. आता संदर्भ क्रमांक ४ च्या पत्रान्वये मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संरक्षण (योजनेत्तर) या योजनेत्तर योजनेखालील १४२ अस्थायी सन २०१९-२० मध्ये दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक २९.०२.२०२० पर्यंत चालू ठेवण्याबाबत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.

२. प्रशासकीय विभागाच्या आकृतिबंधातील समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यत मुदतवाढ देण्याचे अधिकार वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत.

शासन निर्णय :-

१. वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संरक्षण या योजनेत्तर योजनेखालील १४२ अस्थायी पदांना सन २०१९-२० मध्ये दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास सोबतच्या विवरणपत्रानुसार शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे..

२. वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संरक्षण या योजनेत्तर योजनेखालील १४२ अस्थायी पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च २४०६- वनीकरण व वन्य जीवन (योजनेतर), ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवन संरक्षण (००) (००) (०१) निसर्ग संवर्धन व वन्य पशु संरक्षण (२४०६ ०७६६) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. :- पदनि २०१६/प्र.क्र. ८/१६/आ.पु.क. दि. २१.०२.२०१९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१५१२१५३५९७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2019.03.15 12:17:41 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
६. मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक (सर्व). / वनसंरक्षक, प्रादेशिक (सर्व).
७. उपवनसंरक्षक,यावल/जळगांव/अकोट/धारणी/नांदेड/पुसद/पुणे/सावंतवाडी/औरंगाबाद/ नागपूर/वर्धा/अहमदनगर/अलीबाग/कोल्हापूर/ताडोबा राष्ट्रीय उद्यान, चंद्रपूर.
८. उप विभागीय वन अधिकारी, भोर/सांगली.
९. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), म.रा.मुंबई/नागपूर.
१०.फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक डब्ल्यूएलपी ०३.१९/प्र.क्र. १०४/फ-१,
दिनांक :-१५ मार्च, २०१९ सोबतचे विवरणपत्र

(दिनांक :- ०१.०३.२०१९ ते दिनांक :- ३०.०९.२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ दिलेली पदे)

अ.क्र	पद	पदसंख्या
१	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)	१
२	वनसंरक्षक	१
३	वनपाल	२०
४	वनरक्षक	७४
५	शिपाई	५
६	चौकिदार	१
७	खानसामा नि चौकिदार	२
८	सफाई कामगार	१
९	माळी	१७
१०	हत्यारी पोलीस शिपाई	२
११	वाहन चालक	९
१२	स्वच्छक	१
१३	पहारेकरी	७
१४	वनपाल (गाईड)	१
	एकूण	**१४२**

****